(CNR NO.MHAM070003742026)

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११७/२०२६
भावना ... वि... निरंक
मध्ये निशाणी ०१ लगत आदेश

:: **आदेश** ::

१. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ वडील **शशीकांत बापु संगई** हे दिनांक ०६/०१/२०२६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे पत्नी व मुलगा या नात्याने कायदेशिर वारस आहेत.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनांनुसार त्यांना खाजगी व शासकीय कामासाठी प्रस्तुत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. या अर्जासोबत अर्जदारांनी नि.क्र.४ खाली मयताच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार क्र.१ व २ यांचे आधार कार्डाची प्रत दाखल केली आहे.

३. अर्जाचे पृष्ट्यार्थ अर्जदार क्र.२ **विकास शशीकांत संगई** यांनी नि.क्र.०८ वर स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने अर्जातील मजकुराचा शपथेवर पुर्नउच्चार केला आहे. याशिवाय, अर्जदारांनी मयत **शशीकांत बापु संगई** यांचे मृत्युचे प्रमाणपत्र नि.क्र.०९ वर दाखल केलेले आहे. अर्जदाराने शशिकांत बापु संगई यांचे नावे असलेले नगरभुमापन क्र.१८ शिट नं.२१, प्लॉट नं.१८ अंजनगाव सुर्जी येथील मालमत्ता पत्रक नि.क्र.१० वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्र.१ व २ यांच्या आधार कार्डच्या साक्षांकीत प्रती दाखल केलेल्या आहेत. अर्जदार क्र.२ याने त्याचे पुराव्यात अर्जदार क्र.१ व २ हे मयत **शशीकांत बापु संगई** यांचे वारस असल्याचे कथन केले आहे. तसेच सदर वारस वगळता मयत

**शशीकांत बापु संगई** यांना इतर कोणीही वारस नसल्याचे अर्जदार यांनी पुराव्यात सांगीतले आहे. तसेच अर्जदाराने मयत **शशीकांत बापु संगई** यांची आई **अंजनाबाई बापु संगई** ही फार वर्षापुर्वी मयत झालेली आहे असे सांगीतले आहे.

४. अर्जातील कथनांस व विनंतीस कोणाचा आक्षेप आहे की, नाही हे पडताळून पाहणे कामी अर्जातील मजकुराची जाहीर प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्र "**आपली मात्रृभुमी**" च्या दिनांक ०२/०४/२०२६ च्या आवृत्तीत प्रसिध्द केली गेली. सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ते हा आदेश होईपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा विरोध वा आक्षेप या न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र.२ **विकास शशीकांत संगई** यांची साक्ष नि.क्र.०८ वर शपथपत्राव्दारे नोंदविण्यात आली आहे. त्यांची साक्ष ही उलट तपासाविना असल्यामुळे अबाधित आहे. शपथपत्रातील केलेले अभिकथन हे अर्जातील नमुद कथनांस मिळते–जुळते आहे. त्यामुळे अर्जातील कथन, तोंडी व कागदोपत्री पुरावा, इत्यादीचा विचार करता हे सिध्द होते की, अर्जदार क्र.१ व २ हेच मयत **शशीकांत बापु संगई** यांच्या पश्चात कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या शिवाय इतर कोणीही वारस नाहीत. म्हणुन सदर पुरावा ग्राह्य धरणे योग्य होईल. करिता अर्जदार क्र.१ व २ यांना मयत **शशीकांत बापु संगई** यांचे कायदेशिर औपचारीक वारस (formal legal heir) म्हणुन वारस प्रमाणपत्र देणे योग्य होईल. करीता खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ व २ हे मयत **शशीकांत बापु संगई** यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र त्यांच्याकडुन योग्य तो मुद्रांक शुल्क घेवून त्यांच्या नावे देण्यात यावा.

SAGAR BHARAT BAHIRAT
Digitally signed by SAGAR BHARAT BAHIRAT
Date: 2026.06.17 15:32:16 +0530

अंजनगाव सुर्जी
दिनांकः १७/०६/२०२६

**(एस.बी. बहीरट)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंजनगाव सुर्जी